# भाग 13 वा

**अ) नागरीकांसाठी बाहय-रुग्ण विभाग सेवा**

1) महानगरपालिकेच्या कोणत्याही रुग्णालयात 14 दिवसांकरिता बाहय-रुग्ण विभाग नोंदणी पत्रिकेसाठी रु 10/- शुल्क आकारले जाते.
2) प्रयोगशाळेतील नित्याची वैद्यकीय तपासणी विनाशुल्क केली जाते.
3) हृदय-स्पंद आलेखा करिता रु. 2./- प्रती आलेख शुल्क आकारले जाते.
4) क्ष-किरण तपासणी करिता प्रत्येक छायाचित्रणाकरिता रु. 30/- व यु.एस.जी. करिता रु. 200/- शुल्क आकारणी केली जाते.
5) औषध विनाशुल्क दिले जाते.

**ब) आंतररुग्ण विभाग सेवा**

1) आंतर रुग्णांना विनाशुल्क दाखल करण्यात येते.
2) प्रयोगशाळेतील नित्याची वैद्यकीय तपासणी विनाशुल्क केली जाते.
3) हृदय-स्पंद आलेख, क्ष-किरण छायाचित्र आणि यु.एस्.जी करिता अल्पशुल्क आकारणी केली जाते.
4)औषध विनाशुल्क दिले जाते.
5) पथ्य आहार रुग्णांना विना शुल्क दिला जातो.
6) रुग्णांच्या शत्रक्रियेसाठी अल्पशुल्क स्विकारले जाते.
7) रुग्णांना अतिदक्षता विभागात अल्पशुल्क घेउन दाखल केले जाते.
8) गरजू रुग्णांना गरिबांकरिता असलेल्या निधी मधून शुल्क उपलब्ध करुन दिले जाते.
9) योजनेचा/कार्यक्रमाचा कालावधी महापालिका आयुक्तांच्या निर्णयावर अवलंबून असतो.

**क ) कार्यक्रमाची उद्दीष्टे :**

सर्व नागरिकांना परवडण्यासारखी सोयीस्कर आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे.

योजनेचे भौतिक व आर्थिक स्वरुपाचे ध्येय ( मागील वर्षाचे )

महापालिका कर्मचारी /नातेवाईक(अवलंबित/महापालिका शालेय विदयार्थी महापालिकेच्या नियमाप्रमाणे.